## वादीतर्फे साक्षीदार क्र. १ ज्ञानेश्वर पंढरीनाथ जाधव यांचा उलटतपास प्रतिवादी क्र. १, ३, ४ ते ९, ११, १२, १४ ते १७, २२ व २३ चे विधिज्ञ श्री. पी. डी. पवार यांच्यातर्फे शपथेवर सुरु

१. दाव्यातील जमिनीचा गट नं. ३४१ आहे. हे म्हणणे खरे आहे की, आज गट नं. ३४१ असा अस्तित्वात नाही. गट नं. ३४१ चे खरेदी खताने विभाजन झालेले आहे. गट नं. ३४१ चे विभाजन होऊन त्याचे गट नं. ३४१/१, गट नं. ३४१/२, गट नं. ३४१/३ असे गट नंबर पडलेले आहेत.

२. गट नं. ३४१/१ हा वादी पंढरीनाथ जाधव व प्रतिवादी क्र. २३ भाऊसाहेब खंडेराव जाधव यांच्या मालकीचा झालेला आहे. गट नं. ३४१/२ हा प्रतिवादी क्र. १ लहानू जाधवच्या मालकीचा झालेला आहे. गट नं. ३४१/३ हा प्रतिवादी क्र. २० विमल दिनकर जाधव व प्रतिवादी क्र. २१ कुसूम अविनाश जाधव यांच्या मालकीचा झालेला आहे.

३. हल्ली गट नं. ३४१/१, गट नं. ३४१/२ व गट नं. ३४१/३ कोणाच्या मालकीचे आहेत व कोणाच्या ताब्यात आहेत हे मला माहित आहे. गट नं. ३४१/३ चे सन २०१८ नंतर ते आतापर्यंतचे ७/१२ उतारे मी पाहिलेले आहेत. गट नं. ३४१/३ बाबत काय फेरफार झाले, काय खरेदी–विक्री व्यवहार झाले याची मला वैयक्तिक माहिती नाही. सदर दाव्यामध्ये गट नं. ३४१/३ बाबत जे व्यवहार झालेले होते ते ७/१२ उतारे व फेरफार झालेले होते ते प्रतिवादींनी दाखल केलेले आहेत ते मी पाहिलेले नाहीत. गट नं. ३४१/३ पैकी २ हे. ३२ आर क्षेत्र प्रतिवादी क्र. २० ने अरुण अशोक चव्हाण यांना दि.०३.०३.२०१८ रोजी विकली आहे किंवा कसे ते मला माहित नाही. प्रतिवादी क्र. २० ने गट नं. ३४१/३ पैकी २ हे. २० आर क्षेत्र विकले आहे किंवा कसे ते मला माहित नाही. गट नं. ३४१/३

पैकी २ हे. ३२ आर क्षेत्र प्रतिवादी क्र. २१ ने अरुण अशोक चव्हाण यांना विकले आहे किंवा कसे ते मला माहित नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी जमिनीचे रेकॉर्ड न पाहता जबाब देत आहे.

**प्रश्न–** तुम्ही रेकॉर्ड न पाहता आज साक्ष देत आहात?

**उत्तर–** मी सन २०१८ नंतरचे रेकॉर्ड बघितलेले नाहीत.

४. हे म्हणणे खरे आहे की, ज्या मिळकतींचे न्यायालयामध्ये वाद चालू असतात त्या मिळकतींचे उतारे व पिक पाहणी आपण सहसा प्रत्येक वर्षी पाहत असतो. गट नं. ३४१/१, गट नं. ३४१/२, व गट नं. ३४१/३ चे उतारे मी सन २०१८ नंतर बघितलेले नाही. हे म्हणणे खरे नाही की, ज्या मिळकतींशी आपला संबंध असतो, त्या मिळकतीबाबत गावामध्ये जे व्यवहार होतात त्यांची सहसा आपल्याला माहित असते. गट नं. ३४१/१, गट नं. ३४१/२, व गट नं. ३४१/३ या मिळकतींशी माझा संबंध आहे. हे म्हणणे खरे नाही की, त्यामुळे गट नं. ३४१/१, गट नं. ३४१/२, व गट नं. ३४१/३ बाबत जे काही व्यवहार झाले त्यांची मला माहिती आहे.

५. मी सदर दाव्यामध्ये सन २०१३ पासून न्यायालयात येत आहे. दाव्यामध्ये वादी किंवा प्रतिवादी मयत झाल्यास त्यांचे वारस रेकॉर्डवर घ्यावे लागतात याची मला माहित आहे. हे म्हणणे खरे आहे की, मिळकतीच्या मालकीबाबत काही व्यवहार झाल्यास तशी दुरुस्ती दाव्यामध्ये करावी लागते. दावा मिळकतीमध्ये जाण्याचा प्रसंग मला येतो.

**प्रश्न–** दावा मिळकतीमध्ये गेल्यावर त्याबाबतीत जे व्यवहार झालेले असतात त्यांची माहिती कळते?

**उत्तर–** मिळकतीबाबत चोरुन व्यवहार झाल्यास त्यांची माहिती कळत नाही.

६. दावा मिळकतीबाबत प्रतिवादी क्र. २० व प्रतिवादी क्र. २१ ने चोरुन व्यवहार केलेले आहेत असे माझे म्हणणे आहे. हे म्हणणे खरे आहे की, दावा

मिळकतीबाबत अरुण अशोक चव्हाण याने चोरुन व्यवहार केलेला आहे असे माझे म्हणणे आहे. हे म्हणणे खरे आहे की, दावा मिळकतीबाबत अरुण अशोक चव्हाण याने चोरुन व्यवहार केल्याची मला माहिती झाल्यावर त्याबाबत मी कोणतीही कार्यवाही केली नाही. हे म्हणणे खरे आहे की, अरुण अशोक चव्हाणला मी सदर दाव्यात वादी किंवा प्रतिवादी म्हणून सामील केले नाही. सन २०१८ पासून माझे दावा मिळकतीमध्ये येणे–जाणे नाही.

७. हे म्हणणे खरे आहे की, गट नं. ३४१/१, गट नं. ३४१/२, व गट नं. ३४१/३ मधील आजच्या जंगल परिस्थितीची मला वैयक्तिक माहिती नाही. हे म्हणणे खरे आहे की, त्याचे कारण माझा गट नं. ३४१/१, गट नं. ३४१/२, व गट नं. ३४१/३ या मिळकतींशी कोणताही संबंध नाही.

८. मी शेती व नोकरी करतो. मी सन १९९० पासून सन २००८ पर्यंत आर्मी मध्ये होतो. सन २००९ पासून मी स्टेट बँक शाखा पिंपळगाव येथे नोकरी करतो. मी शेलू, ता. चांदवड येथे राहतो व नोकरी जावून–येवून करतो. शेलू ते पिंपळगाव अंतर ३० किमी आहे. स्टेट बँकेमध्ये मी बँक–गार्ड म्हणून नोकरी करतो. हे म्हणणे खरे आहे की, माझी नोकरी जबाबदारीची असून रोज बँक सुरु झाल्यापासून ते बँक बंद होईपर्यंत मला थांबावे लागते. साक्षीदार स्वतःहून सांगतो की तो शिफ्टमध्ये काम करतो. माझी कामाची शिफ्ट सकाळी ९ ते दुपारी ४ व दुपारी २ ते रात्री ९ पर्यंत अशी असते. माझी रात्रपाळी नसते.

९. मी शेलू–पुरी रोडवर राहतो. हे म्हणणे खरे आहे की, दाव्यातील ज्या मिळकती आहेत त्यांना डोंगरशेत नावाने ओळखले जाते. मी जेथे राहतो तेथून डोंगरशेत २ किमी अंतरावर आहे.

१०. हे म्हणणे खरे आहे की, मुळ गट नं. ३४१ माझे आजोबा त्र्यंबक गणपती जाधव यांच्या मालकीचा होता. माझे आजोबा त्र्यंबक गणपती जाधव

सन १९७९ साली मयत झाले. त्यांना मयत हरी त्र्यंबक जाधव व मयत पंढरीनाथ त्र्यंबक जाधव ही दोन मुले व चंद्रभागा बबन वाघ व मयत रंभाबाई पंढरीनाथ पगार अशा दोन मुली होत्या. हे म्हणणे खरे आहे की, माझे वडील पंढरीनाथ त्र्यंबक जाधव शेतीचा व्यवसाय करत होते. हे म्हणणे खरे आहे की, माझे चुलते हरी त्र्यंबक जाधव प्राथमिक शिक्षक होते. हे म्हणणे खरे आहे की, मी प्रस्तुत दाव्यामध्ये हरी त्र्यंबक जाधव यांच्या वारसांना प्रतिवादी क्र. १३ ते १७ म्हणून सामील केलेले आहे. हे म्हणणे खरे आहे की, माझे चुलते मयत हरी जाधव यांची मुले व पत्नी नाशिक, कल्याण, भिवंडीला नोकरी करतात व तेथेच राहतात.

११. हे म्हणणे खरे आहे की, मुळ गट नं. ३४१ हरी त्र्यंबक जाधव व पंढरीनाथ त्र्यंबक जाधव यांनी एकत्रितपणे व एकाचदिवशी खरेदी दिल्या होत्या. हरी त्र्यंबक जाधव व माझे वडील पंढरीनाथ त्र्यंबक जाधव यांनी गट न. ३४१ पैकी ४ हे. ४८ आर जमिन भाऊसाहेब खंडेराव जाधव यांना र.रु २०००/– ला विकली होती. गट नं. ३४१ पैकी ४ हे. ६४ आर जमिन हरी त्र्यंबक जाधव व माझे वडील पंढरीनाथ त्र्यंबक जाधव यांनी दिनकर रायाजी जाधव यांना र.रु. २०००/– ला विकली होती. हरी त्र्यंबक जाधव व माझे वडील पंढरीनाथ त्र्यंबक जाधव यांनी गट न. ३४१ पैकी २ हे. ०२ आर जमिन विलास मुरलीधर जाधव व साहेबराव मुरलीधर जाधव यांना र.रु १०००/– ला विकली होती. हरी त्र्यंबक जाधव व माझे वडील पंढरीनाथ त्र्यंबक जाधव यांनी गट न. ३४१ पैकी ३ हे. ६३ आर जमिन बाबु चिमाजी जाधव व कृष्णा चिमाजी जाधव यांना र.रु २०००/– ला विकली होती. मात्र त्यांनी ते पैसे दिले नाहीत. हरी त्र्यंबक जाधव व माझे वडील पंढरीनाथ त्र्यंबक जाधव यांनी गट न. ३४१ पैकी १ हे. ८१ आर जमिन लहून मुरलीधर जाधव व बाळासाहेब मुरलीधर जाधव यांना र.रु

१०००/- ला विकली होती. मात्र त्यांनी ती रक्कम दिली नाही.

१२. वर नमुद सर्व खरेदीखत हे दि.३०.०८.१९८४ रोजी झाले. दि.३०.०८.१९८४ रोजी मी अज्ञान होतो. हे म्हणणे खरे आहे की, आमच्या कुटूंबाचा सर्व व्यवहार माझे वडील जबाबदारीने करत होते. हे म्हणणे खरे नाही की, त्या व्यवहारांमध्ये कोण-कोण होते व काय अटी-शर्ती ठरल्या होत्या याची मला वैयक्तिक माहिती नाही. ते व्यवहार हरी त्र्यंबक जाधव यांच्या घरी सन १९८४ मध्ये झाले. मात्र त्याची नेमकी तारीख मला सांगता येणार नाही. त्या व्यवहारांवेळी मी स्वतः प्रत्यक्ष हजर होतो. त्या व्यवहारांवेळी भाऊसाहेब खंडेराव जाधव, खंडू हनुमंता जाधव, सुंदराबाई हनुमंता जाधव, दिनकर रायाजी जाधव, साहेबराव मुरलीधर जाधव, लहानू मुरलीधर जाधव हजर होते. त्यावेळी त्यांच्यामध्ये मोबदल्याच्या रकमा घ्यायच्या व खरेदी खत करुन द्यायचे असे ठरले होते. खरेदी पत्र करुन यायचे व घरी येवून पैसे द्यायचे असे त्यांच्यामधील बैठकीमध्ये ठरले होते.

१३. हे म्हणणे खरे आहे की, दि.३०.०८.१९८४ चे जे खरेदीखत आहेत. ते प्रतिवादींनी दाखल करावेत म्हणून मी प्रस्तुतकामी अर्ज दिलेला होता. त्यानुसार लहानू मुरलीधर जाधव व बाळू मुरलीधर जाधव यांनी प्रस्तुतकामी खरेदीखत दाखल केलेली आहेत. मला आता ते दि.३०.०८.१९८४ चे चांदवड दुय्यम निबंधक यांच्याकडे नोंदवलेले खरेदीपत्र क्र.९५४/१९८४ दाखवण्यात आले. ते तेच आहे. त्याला **निशाणी १२२** देण्यात येते. हे म्हणणे खरे आहे की, निशाणी १२२ कडील दस्तामध्ये ''भरणा असा आहे की रुपये ५००/- घरी बिनदस्त रोख घेवून भरुन पावलो आहे व रुपये ५००/- दुय्यम निबंधक चांदवड यांच्यासमोर घेणे आहे'' असे लिहिलेले आहे. तसेच त्यामध्ये दुय्यम निबंधक चांदवड यांच्यासमक्ष र.रु.५००/- लिहून घेणार यांनी दिल्याचा शेरा लिहिलेला आहे. हे म्हणणे खरे आहे की,

त्या दस्तावर माझे वडील व माझे चुलते हरी त्र्यंबक जाधव यांच्या सह्या आहेत. मला आता माझे वडील व चुलते यांनी दि.३०.०८.१९८४ रोजी बाबुराव व कृष्णा चिमाजी जाधव यांना करुन दिलेले मूळ नोंदणीकृत खरेदीदस्त क्र. ९५२/१९८४ दाखवण्यात आले. ते तेच आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यावर माझे वडील, चुलते व साक्षीदारांच्या सह्या आहेत. त्याला **निशाणी १२३** देण्यात येते. त्यामधील भरण्याबाबतचा लिहिलेला मजकूर बरोबर आहे. साक्षीदार स्वतःहून सांगतो की, तो भरणा हरी त्र्यंबक जाधव यांना मिळालेला आहे. त्यांच्या वडीलांना मिळाला नाही. हे म्हणणे खरे आहे की, निशाणी १२३ कडील दस्तावर दुय्यम निबंधक चांदवड यांच्यासमक्ष र.रु. १०००/– भरणा मिळाल्याचा शेरा असून त्यावर माझे वडील व चुलते हरी त्र्यंबक जाधव यांच्या सह्या आहेत.

१४. मी प्रस्तुतचा दावा व माझा सरतपास वाचून पाहिलेला आहे. या खरेदीखतांचा भरणा केवळ हरी त्र्यंबक जाधव यांनी घेतला. तो आम्हाला मिळाला नाही असे माझ्या दाव्यात तसेच सरतपासात नमूद नाही. साक्षीदार पुन्हा सांगतो की, तसे दाव्यामध्ये नमुद आहे. माझ्या म्हणण्यानुसार भरण्याची रक्कम माझ्या वडीलांना तसेच माझे चुलते हरी त्र्यंबक जाधव यांना देखील मिळाली नाही. हे म्हणणे खरे नाही की, भरण्याची रक्कम आम्हाला मिळाली नाही हे मी चुकीचे व खोटे सांगत आहे.

**उलटतपास दोन्ही विधिज्ञांच्या तोंडी विनंतीवरुन पुढील तारखेपर्यंत तहकुब**

श्रवणोत्तर स्विकृत,

SUNGARE VRUSHALI DINANATH
Digitally signed by SUNGARE VRUSHALI DINANATH
Date: 2026.01.24 17:06:31 +0530

दि. २४.०१.२०२६. (वृषाली दी. सुंगारे)

चांदवड सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर, चांदवड.